# जनसुनावणीचे इतिवृत्त

प्रकल्प प्रवर्तक मे. के एल हाउसिंग एलएलपी, ८०८, ८ वा मजला के. एल. रेगालिया, लिंकिंग रोड, खार पश्चिम , मुंबई ४०००५२ यांचा प्रकल्प " द लिडो जुहू सीएचएस", प्लॉट क्रमांक ३१-३२, मेघदूत, जुहू रोड, सांताक्रूझ पश्चिम, मुंबई -४०००४९ येथे रहिवाशी इमारत पुर्नबांधणीचा प्रस्तावासाठी पर्यावरण विषयक सार्वजनिक **सुनावणीचे इतिवृत्त**

**सार्वजनिक सुनावणीची तारीख ०१/०९/२०२१, दुपारी १२.०० वाजता**

ठिकाण: जिल्हाधिकारी आणि जिल्हा दंडाधिकारी कार्यालय मुंबई, उपनगर जिल्हा, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१ झूम ॲपवर ऑनलाइन जनसुनावणी.

सर्वप्रथम श्री ज. शं. हजारे, उपप्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, मुंबई -२ तथा ऑनलाइन जनसुनावणी बैठकीचे निमंत्रक यांनी समितीचे अध्यक्ष, पॅनल सदस्य, झोपडपट्टीवासी / रहिवासी यांचे स्वागत केले आणि अध्यक्षांच्या परवानगीने सभेला सुरुवात केली. त्यांनी सार्वजनिक सुनावणीचा हेतू स्पष्ट केला आणि नमूद केले की MoEF, भारत सरकार, नवी दिल्ली, अधिसूचना SO/१५३३ dt १४th Sep, २००६ अन्व्ये प्रस्थावित प्रकल्पबाधित आणि त्यातील सुधारणा प्रमाणे, आणि किनारपट्टी नियमन क्षेत्र (CRZ) अधिसूचना दिनांक ६ जानेवारी २०११ प्रमाणे सदर प्रकल्प झोपडपट्टीवासी / रहिवाशांची सुनावणी आयोजित केली आहे. सदर प्रकल्प सी.आर.झेड 2 क्षेत्रात पुनर्विकास आणि बांधकाम येत असल्याने, मे. के एल हाउसिंग एलएलपी, ८०८, ८ वा मजला के. एल. रेगालिया, लिंकिंग रोड, खार पश्चिम , मुंबई ४०००५२ यांचा प्रकल्प " द लिडो जुहू सीएचएस", प्लॉट क्रमांक ३१-३२, मेघदूत, जुहू रोड, सांताक्रूझ पश्चिम, मुंबई - ४०००४९असलेले प्लॉट मध्ये प्रस्तावित निवासी प्रकल्पांसाठीचा इंग्रजी आणि मराठी कार्यकारी सारांश अहवालासह सार्वजनिक सुनावणीचा प्रस्ताव म.प्र.नि मंडळाकडे सादर केला होता.

त्यानंतर, जिल्हाधिकारी आणि जिल्हा दंडाधिकारी उपनगर जिल्हा यांनी सार्वजनिक सुनावणीची तारीख ०१/०९/२०२१, वेळ दुपारी १२.०० वाजता अशी नियोजित केली. संयोजकांनी माहिती दिली की, या ऑनलाइन जनसुनावणीसंदर्भातील एक सार्वजनिक सूचना दैनिक "सकाळ" या मराठी वृत्तपत्रात आणि "द फ्री प्रेस जर्नल" इंग्रजीमध्ये २९.०७.२०२१ रोजी प्रकाशित करण्यात आली होती, म्हणजे सार्वजनिक सुनावणीपूर्वी एक महिना, जेणेकरून, प्रस्तावित पुनर्विकास प्रकल्पाबद्दल सूचना, आक्षेप, आणि टिप्पण्या वेळेत प्राप्त होतील. सदर सार्वजनिक सुनावणीसंदर्भातील कार्यकारी सारांश अहवालाची कागदपत्रे भाडेकरू व नागरिकांसाठी पुनरावलोकन/अभ्यासासाठी खालील ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली होती-

१. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर, जिल्हाधिकारी कार्यालय, प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई -४००५१२.

२. पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मंत्रालय, मुंबई.

३. सहसंचालक (WPC), मप्रनि मंडळ, शीव, मुंबई

४. प्रादेशिक अधिकारी- मुंबई/ उपप्रादेशिक कार्यालय, मुंबई -२, मप्रनि मंडळ, कल्पतरू पॉईंट, पहिला मजला, सायन माटुंगा योजना रस्ता क्रमांक ८, सायन सर्कलजवळ, शीव (पूर्व), मुंबई — ४०० ०८८.

५. सहाय्यक आयुक्त, एच/पश्चिम प्रभाग, महापालिका कार्यालय वांद्रे, मुंबई.

प्रकल्प प्रवर्तक मे. के एल हाउसिंग एलएलपी, ८०८, ८ वा मजला के. एल. रेगालिया, लिंकिंग रोड, खार पश्चिम , मुंबई ४०००५२ यांचा प्रकल्प " द लिडो जुहू सीएचएस", प्लॉट क्रमांक ३१-३२, मेघदूत, जुहू रोड, सांताक्रूझ पश्चिम, मुंबई -४०००४९ येथे रहिवाशी इमारत पुर्नबांधणीचा प्रस्तावासाठी पर्यावरण विषयक सार्वजनिक जनसुनावणी. झूम ॲपद्वारे आयडी: ८४१७२०७५३१६, पासकोड: ७३hR१८ प्रमाणे ०१/०९/२०२१ रोजी दुपारी १२:०० वाजता ऑनलाईन आयोजित करण्यात आली होती.

जनसुनावणी समितीचे खालील समिती सदस्य उपस्थित होते.

१. डॉ. विकास नाईक अध्यक्ष — अध्यक्ष,
(अपर जिल्हा दंडाधिकारी मुंबई, उपनगर जिल्हा)

२. ज. शं. हजारे — सदस्य
(प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, मुंबई.)

३. ज. शं. हजारे — संयोजक,
(उपप्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, मुंबई.२)

निमंत्रकाने झोपडपट्टीवासी / रहिवाशांना असेही सांगितले की, सार्वजनिक सुनावणी समितीचा उद्देश सार्वजनिक सुनावणी आयोजित करणे आणि भाडेकरू / रहिवाशांचे मत, सूचना / हरकती, पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून नोंदवणे हा आहे. ही समिती प्रकल्पाबाबत कोणताही निर्णय घेणार नाही. त्यांनी असेही सांगितले की, सार्वजनिक सुनावणी प्रकल्पग्रस्त झोपडपट्टीवासी / रहिवाशांसाठी आहे. प्रकल्प प्रवर्तक प्रकल्पाबद्दल तपशील सादर करेल. त्यानंतर झोपडपट्टीवासी / रहिवासी त्यांच्या सूचना, हरकती, टिप्पण्या आणि मते मौखिकरित्या ऑनलाईन तसेच प्रकल्पाबद्दल लेखी देऊ शकतात, ज्याची नोंद केली जाईल आणि ती महाराष्ट्र तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण, मंत्रालय, मुंबई यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठवली जाईल.

यानंतर, मा.अपर जिल्हा दंडाधिकारी यांच्या परवानगीने संदर सुनावणी प्रक्रिया सुरू करण्यात आली.

श्री. अरुण सोहानी, (तांत्रिक सल्लागार) आणि श्री. प्रथमेश शेट्टी यांनी पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनद्वारे प्रस्तावित प्रकल्पाची माहिती दिली, त्यांनी प्रकल्पाचे स्थान आणि मंजूर CZMP स्थानाचा नकाशा आणि साइटची गुगल प्रतिमा याबद्दल तपशील दाखवला

सीआरझेड अधिसूचना २०११ च्या कलमाप्रमाणे, प्रकल्पाचा तपशील, प्लॉटचा झोन, आजूबाजूचे निवासी आणि व्यावसायिक विकास स्पष्ट केले गेले. त्यांनी रस्ता नेटवर्कद्वारे साइटवरील प्रवेशाबद्दल माहिती दिली आणि प्लॉटबद्दल स्पष्ट केले.

त्यांनी प्रस्तावित बिल्डिंग प्लॉटचे क्षेत्र ६५७.० Sqm आणि एकूण (बांधकाम क्षेत्र )३७००.० चौ. मी तसेच त्यांनी असलेल्या ३ तळमजला कार पार्किंग +तळ + पहिला मजला व्यवसाहिक + २ ते ८ मजले निवासी याबद्दलची माहिती दिली . पाण्याची गरज अंदाजे १६ केएलडी आहे आणि सांडपाणी निर्मिती १३.६० केएलडी होईल.

सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाबाबत तरतुदीस मौन बाळगले , सांडपाणी एमसीजीएम सीवर लाईनमध्ये पुढील प्रक्रियेसाठी सोडले जाईल. एकूण घनकचरा निर्मिती ५१.९० मे.टन/दिवस असेल. त्यापैकी बायोडिग्रेडेबल कचरा ३१ किग्रॅ/ दि OWC मशीन मध्ये प्रोसेस केला जाईल आणि २१ किग्रॅ/ दि नॉन बायोडिग्रेडेबल कचरा अधिकृत कचऱ्याची विल्हेवाट लावणाऱ्या यंत्रणांना दिला जाईल.

त्यांनी बांधकाम टप्पा आणि ऑपरेशनल टप्प्यातील घनकचरा व्यवस्थापन योजना स्पष्ट केली. तसेच बांधकाम उपक्रमाच्या वेळी, हवा आणि ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक खबरदारी घेतली जाईल. ऊर्जेचा वापर, उर्जा बचतीचे उपाय, अग्निशामक उपायांसह देखील स्पष्ट केले गेले. हवामान, पाणी, आवाज, जमीन इत्यादी संदर्भात पर्यावरण व्यवस्थापन योजना, बांधकाम आणि बांधकाम नंतरच्या टप्प्यात स्पष्ट केले — सोबत सादरिकरण अहवालाची प्रत जोडली आहे.

सदर जनसुनावणी तांत्रिक बिघाडामुळे जवळपास अर्धा तास थांबवण्यात आली. त्यानंतर समितीच्या अध्यक्षांनी ऑनलाइन द्वारे उपस्थितीत असणाऱ्या नागरिकांना व संबंधित त्यांचे मत, शंका, आणि हरकती, मते, सूचना प्रकल्पाविषयी, केवळ पर्यावरणीय दृष्टिकोनातून, जर असतील तर व्यक्त कराव्यात, त्याप्रमाणे प्रकल्प प्रवर्तक त्याबाबतची उत्तरे देतील.

**खालील व्यक्तींनी प्रश्न उपस्थित केले.**

१) **श्री. अनिल रोहीरा (रहिवाशी)**
त्यांनी निवासी पुर्नविकास प्रकल्प योजनेचे सादरीकरण पाहिले असून त्यास माझा कुठलाही आक्षेप नाही असे प्रकल्पाच्या पुर्नविकासाला पाठींबा दर्शवला.

२) **श्री. सतीश शा (रहिवाशी)**
त्यांनी निवासी पुर्नविकास प्रकल्प योजनेचे सादरीकरण पाहिले असून त्यास माझा कुठलाही आक्षेप नाही असे प्रकल्पाच्या पुर्नविकासाला पाठींबा दर्शवला.

३) **श्री. अनिल वास (रहिवाशी)**
त्यांनी निवासी पुर्नविकास प्रकल्प योजनेचे सादरीकरण पाहिले असून त्यास माझा कुठलाही आक्षेप नाही असे प्रकल्पाच्या पुर्नविकासाला पाठींबा दर्शवला.

सार्वजनिक सुनावणी यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल समितीच्या अध्यक्षांनी सर्व पॅनेल सदस्य, भाडेकरू / रहिवासी आणि प्रकल्प प्रस्तावकाचे आभार मानले आणि सुनावणी पूर्ण केली.

जनतेकडून लेखी सूचना आणि हरकती काही म.प्र नी मंडळास प्राप्त झालेल्या नाहीत सादरीकरणाची प्रत संदर्भासाठी (एकुण पृष्ठ - १३) सोबत जोडलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| (ज. शं. हजारे)<br>संयोजक,<br>तथा उपप्रादेशिक अधिकारी,<br>म प्र नि मंडळ, मुंबई -२ | (ज. शं. हजारे)<br>सदस्य<br>तथा प्रभारी प्रादेशिक अधिकारी<br>म प्र नि मंडळ, मुंबई | (डॉ. विकास नाईक)<br>अपर जिल्हा दंडाधिकारी,<br>मुंबई उपनगर जिल्हा तथा<br>अध्यक्ष, सार्वजनिक सुनावणी समिती |